महाराष्ट्र टाइम्स

30th December 2011

# पुन्हा एकदा 'हम दोनो'



'हम दोनो' या अजरामर सिनेमाचं स्क्रीनिंग नुकतंच एफटीआयआयमध्ये झालं. त्यावेळी देवानंदचा स्टायलिश अभिनय आणि अविस्मरणीय संगीताचा पुनश्च आस्वाद घेण्यासाठी सिनेप्रेमींची गर्दी झाली होती.

पुणे टाइम्स टीम
mtpunetimes@indiatimes.com

'हर फिक्र को धुंए में उडाता चला गया' हे गाणं झाल्यानंतर कॅप्टन महेश आनंद (देवानंद) जीप काढून निघतो. थोडंसं पुढे गेल्यावर रस्त्यात त्याला एक पाकीट पडलेलं दिसतं. गाडी थांबवून तो ते पाकीट उचलतो आणि उघडून पाहतो. त्यात त्याला एका स्त्रीचा फोटो आणि मेजर वर्मा असा एक संदर्भ सापडतो. तो त्या पाकिटातील पत्त्यानुसार आर्मीच्या कँपवर जातो. कँपवर दारू पिण्यात सगळे गुंग असतात. अशातच मेजर वर्मा तिथं येतात आणि विचारतात, 'मेरा पर्स कहीं देखा?' त्याला 'नाही' असं उत्तर मिळतं. वर्मा नाराज होऊन दारू पिणाऱ्या मित्रांमध्ये मिसळून जातात. इतक्यात तिथं कॅप्टन महेश येतो आणि विचारतो, 'कॅप्टन वर्मा?' दारूच्या काउंटरचा माणूस त्याला पाहून आश्चर्यचकित होतो. त्याला काहीच कळत नाही. स्वतःला दारू चढलीय की काय असा धक्का त्याला बसतो आणि तो म्हणतो, 'हां, मेजर वर्मा'. कॅप्टन महेश 'मेजर वर्मा' असं मोठ्या आवाजात म्हणून तिथून निघतो. तो आवाज ऐकून वर्मा त्याच्याकडे पाहतात; पण त्यांनाही धक्का बसतो. कारण दोघंही एकसारखे दिसत असतात. पाकिटाच्या आठवणीवरून त्यांच्यात एकमेकांच्या दिसण्याविषयी वगैरे चर्चा होते, प्रेम, लग्नाचा विषय होतो. महेशच्या प्रेमप्रकरणात असलेल्या अडचणी लक्षात आल्यावर मेजर सिगार पिता पिता म्हणतात, 'जो प्यार ठुकराया गया है वो बुझता नहीं, सिर्फ धुंआ छोडता रहता है. मेरी रुमा मेरे दिल में इतनी बसी है, के गोली लगने के बाद भी मैं मर नहीं सकता'.



नुकत्याच कालवश झालेल्या देवानंद यांच्या स्मरणार्थ एशियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'हम दोनो' या अजरामर सिनेमाचं स्क्रीनिंग एफटीआयआयला करण्यात आलं. विजय आनंदचं दिग्दर्शन, देवानंदचा डबल रोल, जयदेवचं उत्तम संगीत, लीला चिटणीस, साधना, नंदा या मंडळींचा दमदार अभिनय आणि देवानंदचा स्टायलिश अभिनय पाहून पुन्हा एकदा नॉस्टॅल्जिक होण्यासाठी सिनेप्रेमींनी या स्क्रीनिंगला गर्दी केली होती. 'हम दोनो' रंगीत स्वरुपात आल्यावरही त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. फेस्टिव्हलमध्ये मात्र, मूळ ब्लॅक अँड व्हाइट सिनेमाच दाखवण्यात आल्यानं प्रेक्षक जास्त खूष होते. १९६१ सालचा हा सिनेमा आजही तितकाच फ्रेश वाटत असल्याचं प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहून लक्षात आलं. या प्रेक्षकांमध्ये एफटीआयआयच्या मुलांची संख्याही जास्त होती. गाणी चालू होताच प्रेक्षकांमधूनही गुणगुणणं कानावर पडत होतं. या फिल्ममुळे एशियन फिल्म फेस्टिव्हलला 'चार चाँद' लागले हे नक्की!